# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग

## स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज सुचना

सहाय्यक आयुक्त ('एस' विभाग) 'एस' विभागामध्ये प्रत्येक शनिवारी डिप क्लिनिग करण्याकरिता संस्थाची नियुक्ती करण्यासाठी सदर कामाचा अनुभव असणा-या संस्थाकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन काम करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज मागवित आहे.

याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी सहा. अभियंता (घकव्य) 'एस' विभाग यांच्याकडे पुढील पत्यावर संपर्क साधावा.

सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग यांचे कार्यालय,<br>
सहाय्यक अभियंता ( घकव्य ),<br>
4 था मजला,मंगतराम पेट्रोलपंप जवळ,<br>
भांडुप (प) मुंबई- 400078.

सदर संस्थाची विभाग कार्यालयात स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.05.03.2024 (दु. 01 वाजेपर्यंत) आहे.

**सही/-**<br>
**सहाय्यक अभियंता (घकव्य)'एस' विभाग**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.: स.अ/एम/पूर्व/                    /घकव्य   दि.      /     /2024

**विषय**:  एस विभागातील सार्वजनिक शौचालयांची  स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्याकरीता एनजीओ संस्था              नियुक्त करण्याबाबत.

संदर्भः- 1) MDM/P/2771 dt.13.10.2023
2) प्रअ/घकव्य/5932/ दि.09.11.2023

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मुंबईतील एकुण स्वच्छता व सार्वजनिक शौचालयांची दिवसातून किमान ६ वेळा स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने मा. मनपा आयुक्त व मा. अति आयुक्त (पु.उ.) यांनी देखील VC द्वारे घेतलेल्या बैठकीदरम्यान सदर निर्देशाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने एस विभागात एकुण ८१५ शौचालये असून त्यापैकी २४ शौचालये पैसे दया व वापरा या तत्वावरील, १०५ सीबीओ तत्वावरील, ५५९ म्हाडा, १८३ मनपा सीबीओ नसणारी शौचालये व   CSR अंतर्गत बांधण्यात आलेली शौचालये आहेत. यापैकी पैसे दया व वापरा या तत्वावरील सर्व व सीबीओ असणा-या शौचालयापैकी 70 % शौचालये व CSR अंतर्गत असणारी अर्धे शौचालये यांची साफसफाई व निर्जंतुकीकरण हे नेमुन दिलेल्या संस्थेमार्फत योग्य प्रकारे करण्यात येत असून मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करण्याकरीता त्या सर्व संस्थाना लेखी स्वरुपात सुचना देण्यात आलेल्या आहेत.

उर्वरीत म्हाडा प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेली शौचालये, मनपाची सीबीओ नसलेली शौचालये व अंदाजे 30% सीबीओला देखभाल व परिरक्षण करण्याकरीता देण्यात आलेली परंतु संस्थेमार्फत शौचालयाची देखभाल व परिरक्षण करण्यात न येणारी अशा सर्व शौचालयांची साफसफाई मनपा हलालखोर व SMPA मार्फत करण्यात येते. परंतु शौचालयाचा वापर मोठया प्रमाणात असल्याने या सर्व सार्वजनिक शौचालयाची एक वेळा साफसफाई करुन योग्य प्रकारे स्वच्छता दिसून येत नाही. सबब उपरोक्त नमुद सर्व शौचालयांची दिवसातून किमान 2 वेळा संपुर्ण स्वच्छता, ४ वेळा साफसफाई व निर्जंतुकीकरण करण्याकरीता नगरसेवक प्रभागनिहाय 1 संस्था अशाप्रकारे 1४ संस्थामार्फत अतिरिक्त एनजीओ घेवून करण्याचे या कार्यालयाने नियोजिले असून त्याकरीता सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मनपा नियमाप्रमाणे 40 शौचकुपांची एक वेळा साफसफाई करण्याकरीता 1 हलालखोर/ एनजीओ असून दिवसातून 5 वेळा साफसफाई करण्याकरीता एसविभागाचे सर्व शौचालय झोपडपटटीमय परिसरात असून दाट लोकसंख्येने व्यापलेले आहेत तसेच मोठया प्रमाणात शौचालयाचा वापर होत असल्याने ३0 शौचकुपांमागे 1 एनजीओ या प्रमाणे – 4377 शौचकुपांसाठी- 224 एनजीओ 15 संस्थांमार्फत घेण्याकरीता किमान वेतन दरानुसार 2 महीन्यांकरीता (60 दिवसांकरीता) या कार्यालयामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून पृ.क्र सी-1 वर जोडण्यात आले आहे. तसेच उपरोक्त संस्थेमधील कामगारांचा दर प्रति दिन प्रती कामगार रु.743.84 + 49.58% लेव्ही इतका असून पृ.क्र.सी-     वरील परिपत्रकामधील किमान वेतन दरानुसार देण्यात येईल.

या करीता या कार्यालयामार्फत या पूर्वी सादर केलेल्या प्रस्तावास मा.उप आयुक्त (परि-5) यांनी मंजुरी दिली असून सदर काम तातडीने सुरु करण्याकरीता मा. मनपा आयुक्त व मा. मनपा अति आयुक्त (प.उ.) यांनी वेळोवळी घेतलेल्या VC द्वारे आदेश दिले आहेत. याकरीता निधीची तरतुद प्रमुख अभियंता (घकव्य) विभागामार्फत करण्यात आली असून निधी हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर निधी प्राप्त् होईपर्यंत संस्थांची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही करण्याकरीता सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त कामाकरीता प्रभागनिहाय संस्थानिहाय खर्चाचा तपशील पृ.क्र.सी- वर जोडण्यात आला आहे.

सदर बाब तातडीची असल्याने संस्था निवड पध्दतीने नियुक्त केल्यानंतर संस्थानिहाय खर्चाच्या मंजुरी करीता सदर प्रस्ताव लेखा अधिकारी एसयांच्या पडताळणी नंतर मा. उप आयुक्त (परि-5) यांच्या मंजुरी करीता पुनःश्च सादर करण्यात येईल.

सबब मा. उप आयुक्त (परि-5) यांना विनंती करण्यात येते की, खालील नमुद बाबींकरीता कृपया आपली मंजुरी मिळावी

1. मा. मुख्यमंत्री महोदय व त्याअनुषंगाने मा. मनपा आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार एसविभागातील 246 सार्वजनिक शौचालयांची दिवसातून किमान 5 वेळा साफसफाई व निर्जंतुकीकरण 15 संस्थामार्फत 224 एनजीओ कडून 2 महीन्यांच्या कालावधीकरीता (60 दिवसांकरीता) काम करुन घेण्याकरीता
2. सदर कामाची मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर व सुचना फलकावर जाहिरात प्रसारीत करुन इच्छुक स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्था / बचतगटांकडून अर्ज मागवून सोडत पध्दतीद्वारे संस्था नियुक्त करण्याकरीता
3. इच्छुक संस्थाना छाननी शुल्क रु.3000/- अधिक 18% GST या किमतीत विकण्यास
4. सदर कामाकरीता प्रमुख अभियंता यांच्यामार्फत अतिरिक्त निधी

सविनय सादर.

श्री. रा.रा शिंगाडे
दु.अभि.(घ.क.व्य.) एस

श्री. संदीप रा. गवारे
सहा.अभि. (घ.क.व्य.) एम/पूर्व

श्रीम. अलका ससाणे
सहाय्यक आयुक्त एसविभाग

<u>श्री. हर्षद काळे</u>
<u>मा. उप आयुक्त (परि-5)</u>

महोदय,

Manpower required considering 30